'एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ'



स्थापना २८.८.१९८९

''जनसामान्यांच्या विश्वासाचं प्रतिक''

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ



। CBS प्रणाली । कोणत्याही शाखेतून बँक व्यवहार

। वैयक्तिक कर्ज । गृहतारण कर्ज । वाहन तारण कर्ज । व्यवसाय कर्ज

। वेगवेगळ्या बचत योजना । तत्पर ग्राहक सेवा



२६ वा


## वार्षिक अहवाल २०१४-२०१५

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ

## संचालक-मंडळ



श्री. जयवंतराव बंडू काटकर
संस्थापक - अध्यक्ष



श्री. मनोहर पां. जाधव
उपाध्यक्ष



श्री. प्रकाश शं. पाटील
सचिव



श्री. जगदीश वि. मोरे
खजिनदार



श्री. हणमंत स. घनवट
संचालक



श्री. प्रकाश शं. पवार
संचालक



सौ. मंगला श्रीधर ढाले
संचालिका



सौ. निलम अ. आंब्रे
संचालिका



श्री. तुकाराम अं. शेंडे
संचालक



श्री. भगवान अ. ऊतेकर
संचालक



श्री. शंकर जि. शेलवले
संचालक



श्री. हरीश्चंद्र य. येरूणकर
संचालक



श्री. बाबुराव ना. साठे
संचालक



श्री. महादेव वि. थोरे
संचालक



श्री. विजय अ. पाटील
तज्ञ संचालक



श्री. संजय ज. दरेकर
तज्ञ संचालक

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ

पत्ता : १०१ व १०२, साकेत अपार्टमेंट, पहिला माळा, वडवली विभाग, अंबरनाथ (पू.), जि. ठाणे - ४२१५०१.

जा. क्र. - श्री.म.ना.स.प./वा.सर्वसा. सभा नोटीस / /२०१५-२०१६ दि. ७.०८.२०१५

## वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना

(फक्त सभासदांसाठी)

स. न. वि. वि.

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ ह्या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, पतसंस्थेची सन २०१४-१५ या वर्षाची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २३.०८.२०१५ रोजी सकाळी १०.०० वा. रोटरी क्लब, वडवली विभाग, अंबरनाथ (पू.) येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी आयोजित करण्यात येत आहे. कृपया सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

## सभेपुढील कामकाजाचे विषय

१) दि. २४/०८/२०१४ रोजी झालेल्या २५व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) दि. ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वर्षाचा, संचालक मंडळाने सादर केलेल्या अहवालास मान्यता देणे.
३) सन २०१४-१५ या वर्षाच्या मान्य अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.
४) दि. ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वर्षाचा, संचालक मंडळाने सादर केलेला ताळेबंद व खर्च-उत्पन्न पत्रकास मान्यता देणे.
५) संचालक मंडळाने सुचविलेल्या नफ्याच्या विनियोगास मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.
६) सन २०१५-१६ च्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.
७) सन २०१५-१६ या अर्थिक वर्षासाठी अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणुक करणे व मेहनताना ठरविणे.
८) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणुक करणे व मेहनताना ठरविणे.
९) मा. अध्यक्षांचे अनुमतीने, आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

सही/-
प्रकाश शंकर पाटील
सचिव
(संचालक मंडळाच्या आदेशानुसार)

## विशेष सूचना

१) गणसंख्येच्या अभावी सभा तहकुब झाल्यास अशी स्थगीत झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी, अर्ध्या तासानंतर त्याच विषयांवर बोलविण्यात येईल. त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.
२) सभेचे कामकाज व्यवस्थित पार पाडता यावे या दृष्टीने, ज्या सभासदांना काही सूचना मांडावयाच्या असतील किंवा प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी आपल्या सुचना अगर प्रश्न सभेच्या ७ दिवस अगोदर लेखी स्वरुपात संस्थेच्या कार्यालयीन वेळेत आणून द्यावेत.
३) सभेस येतांना सभासदांनी आपला अहवाल सोबत आणावा.

# २६ वा वार्षिक अहवाल
# सन २०१५-२०१६

सन्माननीय सभासद, ठेवीदार, हितचिंतक बंधू भगिनींनो,

सप्रेम नमस्कार,

आपल्या पतसंस्थेने मागील वर्षी आपले रौप्यमहोत्सवी वर्ष आपल्या सहकार्याने मोठ्या दिमाखात पार पाडले. आता आपली पतसंस्था सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी झेपावत आहे. २५ वर्षाच्या कालावधीत अनेक लहान मोठे कटू प्रसंग सहकार क्षेत्रात निर्माण झाले, परंतु पतसंस्थेने आजपर्यंत नेत्रदिपक व दमदार वाटचालीमुळे आर्थिक स्थैर्य असणारी, सुरक्षित व सर्वांना आपलीशी वाटणारी श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ ही आपली पतसंस्था ठाणे जिल्हयातील एक आदर्श पतसंस्था म्हणून नावारुपाला आली आहे. याचे सर्व श्रेय आपण सर्व सभासद, ठेवीदार वर्गाला जाते. या यशाचे खरे मानकरी आपणच. सर्वात महत्वाचे म्हणजे "सहकार" सहकारात सर्वांना बरोबर घेऊन सामुहीक निर्णय -प्रक्रीया राबवून कामातील पारदर्शकता, निस्वार्थी भावना व पतसंस्थेच्या खर्चावर नियंत्रण ठेवणे ही पंचसुत्री संचालक मंडळाने जाणली असुन त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे चालू असते. आर्थिक क्षेत्रामध्ये सातत्याने चढ-उतार होत असतात. म्हणूनच या क्षेत्रात काम करताना व्यावसायिक गुणवत्ता, सतत अभ्यास, कौशल्य व सतर्कता आवश्यक आहे. पंतसंस्थेचे संचालक मंडळ हाच ध्येयवाद घेऊन उदात्ततेच्या प्रेरणेने काम करीत आहे.

सध्याच्या स्पर्धात्मक युगात पतसंस्थेशी एकनिष्ठ व पारंपारिक ग्राहक टिकवून ठेवण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. त्यासाठी अभिनव व सेवाभावी उपक्रम राबवून सक्षम ग्राहक मिळविण्यासाठी, ग्राहकांना उत्तम सेवा, ठेवीदारांना आश्वस्त करणारी सुरक्षितता, त्यासाठी नियमित कर्ज वसुली

आणि सभासदांना समाधानकारक लाभांश याकडे संचालक मंडळाचे सर्वाधिक लक्ष असते. त्यांचे हित जपण्याचे प्रामाणिक प्रयत्न होत राहील्यानेच ग्राहकांचा विश्वास संपादन करण्यात संस्थेला आजचे यश प्राप्त झाले आहे.

सुवर्णमहोत्सवाकडे आगेकुच करताना आज पतसंस्थेकडे सुमारे २ कोटी १८ लाखांचे वसुल भागभांडवल असुन ४०७१ सभासद आहेत. या आर्थिक वर्षात पतसंस्थेने सुमारे ४२ कोटींचा संमिश्र व्यवसायाचा टप्पा पार केला आहे. आपल्या पंतसंस्थेची गतिमान वाटचाल अशीच सुरु राहील असा मला विश्वास वाटतो. संचालक मंडळाची एकवाक्यता योग्य मार्गदर्शन तत्पर व प्रशिक्षीत कर्मचारी वर्गाच्या सहकार्यानेच व आपल्या सर्व सभासदांच्या भक्कम विश्वासावरच आपले मार्गक्रमण असेच डौलदारपणे सुरु राहो. हीच इश्वरचरणी प्रार्थना.

**शाखा निहाय सांपत्तीक स्थिती -**

| शाखा | भाग भांडवल | ठेवी | कर्जे | व्याज वसुल |
|---|---|---|---|---|
| अंबरनाथ | २१८,५७,०५०.०० | १३,९९,३७,९१५.०० | ८७३,५३,२८१.०० | १,०४,४५,८४९.०० |
| बदलापूर | ------------ | ६,२१,४३,५२९.०० | ६,५८,३६,४३४.०० | ८६,६३,९१४.०० |
| डोंबिवली | ------------ | ७९,१२,९३३.०० | ९५,९५,३४४.०० | ७,५८,५४८.०० |
| कल्याण | ------------ | १६९,१९,१४७.०० | १२६,१७,४९८.०० | १५,७३,२९९.०० |
| टिटवाळा | ------------ | १०८,६३,१२०.०० | ७२,६८,७७८.०० | ९,०१,०३८.०० |

**आर्थिक वर्ष २०१४ - १५ आढावा -** सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात सर्व सभासद व ठेवीदार यांच्या भरघोस पाठींब्यावर आपल्या संस्थेस प्रगती साधता आली हे खालील तुलनात्मक आकडेवारीवरुन स्पष्ट होते.

रुपये लाखात

| तपशील | २०१३ - २०१४ | २०१४ - २०१५ | % वाढ |
|---|---|---|---|
| **अ) जबाबदाऱ्या** | | | |
| १) भागभांडवल | २०४.५१ | २१८.८२ | ६.९९% |
| २) स्वनिधी | १११.७३ | १२३.३५ | १०.४०% |
| ३) ठेवी | २१९४.८० | २३७७.३८ | ८.३१% |
| ४) निव्वळ नफा | २६.१० | २८.५५ | ९.३८% |
| **ब) मालमत्ता** | | | |
| १) कर्जे | १६३०.३३ | १८२६.७१ | १२.०४% |
| २) गुंतवणुक | ६७७.३४ | ७८९.९९ | १६.६३% |
| ३) कायम व इतर मालमत्ता | १२०.१७ | ११४.९४ | ४.३५% |
| **क) उत्पन्न** | | | |
| १) मिळालेले व्याज | २७२.०६ | २९९.७८ | १०.१८% |
| २) इतर उत्पन्न | २०.८७ | ४.७७ | ७७.१४% |
| **ड) खर्च** | | | |
| १) दिलेली व्याजे | १९४.४६. | २१७.८१ | १२.००% |
| २) सेवक पगार व भत्ता | २८.३३ | २२.१२ | २१.९२% |
| ३) इतर खर्च | २०.९३ | २७.५० | ३१.३९% |
| ४) तरतुदी | २३.०८ | ५.८३ | -७४.७४% |
| **इ) इतर बाबी** | | | |
| १) प्रती सेवकामागे व्यवसाय | ११३.४६ | १३९.३३ | २२.८० |
| २) उत्पन्नाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | ११.२२ | १०.६८ | -०.५४ |
| ३) खर्चाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | ९.३३ | ९.४६ | ०.१३ |
| ४) निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | १.०० | १.०१ | ०.०१ |

**१) सभासद व भागभांडवल -** आपल्या संस्थेची सभासद संख्या दि. ३१ मार्च २०१४ अखेर ३९७२ इतकी होती. त्यामध्ये अहवाल साली २९४ नवीन सभासद करून घेण्यात आले. पैकी १९४ सभासदांनी त्यांच्या सभासदत्वांचे राजीनामे दिल्याने या वर्षाअखेरीस ४०७१ एकुण सभासद आहेत.

पतसंस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. ५ कोटी असून अहवाल वर्षात भाग-भांडवलात लक्षणीय वाढ झाली आहे. मागील वर्षी पतसंस्थेचे वसूल भागभांडवल रुपये २,०४,५१,१४०.०० होते. त्यामध्ये ६.८७% वाढ झाली आणि अहवाल वर्ष अखेरीस वसूल भाग भांडवल रुपये २१८,५७,०५०.०० जमा झालेले आहे.

**२) स्वनिधी -** अहवाल सालाच्या सुरूवातीस राखीव निधी व इतर निधी मिळून रूपये १,११,७३,५१०/- जमा होते. सन २०१४-१५ अखेरीस त्यात रू. १०,६२,०४८/- ने वाढ होऊन एकूण रूपये १,२२,३५,५५८/- इतका स्वनिधी जमा आहे.

**३) ठेवी -** पतसंस्थेविषयी असलेला विश्वास हा ठेवींच्या आकड्यांमध्ये प्रतीत होतो. पतसंस्थेच्या ठेवी गतवर्षी रु. २१,९४,८०,९९४/- होत्या. त्यामध्ये ८.३१% वाढ होऊन वर्ष अखेर एकूण ठेवी रु. २३,७७,३१,९६८/- झाल्या आहेत. संस्थेच्या विविध ठेव योजनांमध्ये आपण सामील होऊन आपल्या विकासाबरोबर संस्थेच्या विकासास हातभार लावा.

| ठेव योजनांचे नांव | ठेव रुपये |
|---|---|
| मुदत ठेवी | १४,२०,२८,१०७.०० |
| मासिक ठेवी | ९१,०८,३८२.०० |
| दैनंदिन ठेवी | ८,२४,०४,०३२.०० |
| बचत ठेव | ४१,९८,४४७.०० |
| **एकूण ठेवी** | **२३,७७,३१,९६८.००** |





**४) कर्जवाटप - कर्जवसुली -** गतवर्षी रुपये १६,३०,३३,६५९.०० कर्ज येणे बाकी हाते. अहवाल वर्षात विविध प्रकारचे जामीनकी व तारणी कर्ज वितरण केले असून. दि. ३१/३/२०१५ अखेर रु. १८,२६,७१,३३५ इतके कर्ज येणे बाकी आहे. अहवालसाली गतवर्षीपेक्षा १२.०४% कर्जवाटपात वाढ झाली आहे. तसेच संस्थेचे कर्ज व ठेवीचे प्रमाण (C. D. Ratio) ६६.२२% इतके आहे.

थकीत कर्जवसुलीकडे विशेष लक्ष देण्याचा संचालक मंडळाचा प्रयत्न असतो. सर्व प्रकारचे उपाय करून सुद्धा वसुली न झाल्याने नाईलाजाने काही थकीत कर्जदार व त्यांचे जामीनदार यांच्यावर कठोर कारवाई करावी लागते. सहकारी कायद्यातील कलम ९१ व १०१ अंतर्गत दि. ३१.०३.२०१४ अखेर ७१ वसुली दाखल्यांची कारवाई चालू होती. अहवाल सालामध्ये नवीन २२ वसुली दाखले प्राप्त झाले. एकूण वसुली दाखल्यांपैकी २२ वसुली दाखल्यांची रक्कम रू. १४,२८,५६६/- वसूल झाली असून अहवाल सालाअखेर ७१ वसुली दाखल्यांची वसुलीची अंमलबजावणी सुरू आहे. कर्ज वसुलीचे कामकाज जलदगतीने होण्याकरीता ठाणे जिल्हा नागरी / पगारदार सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. ठाणे यांनी मोलाचे सहकार्य केले.

**५) गुंतवणुक -** सुरक्षितता व विश्वासार्हता या पार्श्वभुमीवर तरलतेपोटी विविध शेड्युल व मोठ्या सहकारी बँकांमध्ये अहवाल साला अखेर रूपये ७,८७,९९,७७६/- मुदतठेवीमध्ये गुंतवणूक करण्यात आली आहे. संस्थेने राखीव निधीची दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि. ठाणे या बँकेत १००% गुंतवणूक केली आहे.

**६) नफा व नफा विभागणी -** अहवाल वर्षात पतसंस्थेस एकूण खर्च व तरतुदी वजा जाता **रु. २८,५५,८५१.६७ नफा झाला** असून मागील वर्षाचा शिल्लक नफा रु. ८००.९१ होता. म्हणजेच एकूण **नफा रु. २८,५६,६५२.५८** इतका झाला आहे. सहकार खाते यांच्या सुचना आणि नियमानुसार एकूण नफ्याची विभागणी संचालक मंडळाने सुचविली आहे. त्यास मान्यता मिळावी अशी विनंती मी, संचालक मंडळाच्या वतीने आपणा सर्वांस करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) राखीव निधी २५ % | रु. | ७,१३,९६३.०० |
| २) लाभांश ९ % | रू. | १८,४०,६०३.०० |
| ३) लाभांश समीकरण निधी | रु. | १०,०००.०० |
| ४) सभासद कल्याण निधी | रु. | ११,०००.०० |
| ५) कर्मचारी कल्याण निधी | रु. | १५,०००.०० |
| ६) सहकार शिक्षण प्रशिक्षण निधी | रू. | ४०,०००.०० |
| ७) गुंतवणुक चढ-उतार निधी | रु. | २५,०००.०० |
| ८) निवडणूक निधी | रु. | ५०,०००.०० |
| ९) संशयीत व बुडीत कर्ज निधी | रु. | १,५०,०००.०० |
| १०) शिल्लक नफा | रु. | १,०८६.५८ |
| **एकूण** | **रु.** | **२८,५६,६५२.५८** |

**७) संचालक मंडळ -** संचालक मंडळाच्या वर्षभरात एकूण १४ सभा झाल्या आहेत. संस्थेचे दैनंदिन कामकाज पोटनियमांना अनुसरून व सहकारी कायद्याच्या तरतुदीनुसार होण्याच्या दृष्टीकोनातून संस्थेच्या कार्यालयात नियमित येऊन सेवक वर्गाबरोबर योग्य ती सल्लामसलत करून कामकाज हाताळीत असतात. सहकार क्षेत्रात होणारे अमुलाग्र बदल स्विकारून, संस्थेची उज्वल परंपरा राखणे, संस्थेस प्रगतीपथावर नेणे व सर्वसामान्य समासदांच्या आर्थिक अडचणींचे निवारण करणे या उद्दीष्टांसाठी संचालक मंडळ सदैव कार्यरत असते.

**८) कर्मचारी प्रशिक्षण -** आधुनिक तंत्रज्ञानात होणारे बदल तसेच, नियमांत वारंवार होणारे बदल यानुसार आपले ज्ञान व माहिती अद्ययावत रहावी, या हेतूने प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येते. अहवाल वर्षात महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या., पुणे व सहकार प्रशिक्षण केंद्र नाशिक यांनी आयोजित प्रशिक्षण वर्गास (दि. १८.०१.१५ ते २०.०१.१५) आपल्या सर्व संचालक व कर्मचाऱ्यांनी हजेरी लावली या प्रशिक्षण कार्यक्रमात ग्राहक सेवा, कर्ज व निधी व्यवस्थापन व सहकारी कायदा व इतर कायदे या विषयांवर तज्ञ व्यक्तींनी बहुमोल मार्गदर्शन केले.

**९) कोअर बँकींग संगणक प्रणाली** (CBS) - पतसंस्थेने आपल्या आर्थिक वर्षात नेटविन सिस्टिम अँड सॉफ्टवेअर (इं.) प्रा. लि. या कंपनीबरोबर करार करुन अद्यावत तंत्रज्ञान आधारीत परीपूर्ण संगणक प्रणाली कार्यान्वित केली आहे. या संगणकीय प्रणालीमुळे पतसंस्था आपल्या सभासद-खातेदारास पतसंस्थेच्या कोणत्याही शाखेतून सर्वप्रकारची सुविधा पुरवत आहे. (*Any Branch Banking*) जेणेकरुन ग्राहकाला व्यवहार करण्यास कोणतीही गैरसोय होणार नाही. या प्रणालीच्या आधारे पतसंस्था भविष्यात मोबाईल बँकींग एन.इ.एफ.टी./ आर.टी.जी.एस. या प्रकारच्या सुविधा पुरविणार आहे.

**१०) जनता अपघात विमा -** पतसंस्थेने आपल्या सर्व इच्छुक सभासदांसाठी व कर्जदारांसाठी दि ओरिएण्टल, इन्श्युरंन्स कंपनी लि. च्या माध्यमातून वैयक्तिक जनता अपघात विमा पॉलिसी अंतर्गत विमा उपलब्ध करून दिला आहे. या पॉलिसीची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे....

१) किमान रू. ५०,०००/- व कमाल रू. ५,००,०००/- पर्यंत अपघात विमा संरक्षण उपलब्ध.

२) रक्कम रू. ५,००,०००/- च्या विम्यासाठी तीन वर्षाकरीता रू. ८१०/- हप्ता.

३) कोणत्याही कागदपत्रांची आवश्यकता नाही. कुठल्याही प्रकारच्या वैद्यकिय तपासणीची गरज नाही.

४) अधिक माहीतीसाठी नजिकच्या शाखा कार्यालयात संपर्क साधवा.

**११) श्रद्धांजली -** अहवाल सालामध्ये देशातील थोर नेते, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक, शास्त्रज्ञ, जवान, सहकार तज्ञ, आपल्या संस्थेचे मान्यवर सभासद, ठेवीदार, हितचिंतक अशा थोर विभूती पंचतत्वात विलीन झाल्या त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !

**१२) आभार व ऋणनिर्देश -** आपल्या पतसंस्थेस वेळोवेळी ज्या-ज्या व्यक्तिंनी सहकार्य दिले त्यांचा ऋणनिर्देश करणे क्रमपात्र ठरेल. मा. श्रीमती. लाटकर मॅडम विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, मा. श्री. डी. बी. उढाण जिल्हा उपनिबंधक सह. संस्था ठाणे, मा. श्री. एल्. एस्. लष्कर, सहाय्यक निबंधक सह. संस्था अंबरनाथ तालुका मा. श्री. जी. बी. ठाकूर मा. सहाय्यक निबंधक सह. संस्था कर्जत तालुका व श्री. मोहिते साहेब सहाय्यक निबंधक सह. संस्था अंबरनाथ तालूका यांनी पतसंस्थेस भेट देऊन बहुमुल्य मार्गदर्शन करून प्रोत्साहीत केले. या मान्यवरांची संस्था ऋणी आहे. मा. अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मुंबई, ठाणे जिल्हा नागरी / पगारदार सह. पतसंस्था फेडरेशनचे मा. अध्यक्ष, सचिव, व्यवस्थापक अशोक काळे, विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री. प्रकाश निकम, मा. श्री. एच्. जी. शेटे, माजी प्राचार्य मुंबई जिल्हा सहकारी बोर्ड लि., मा. श्री. पी. के. कापडणीस व मा. श्री. व्ही. व्ही. देसाई निवृत्त मुख्याधिकारी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या., पुणे यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शन व सहकार्याबद्दल आभार.

पतसंस्थेचे कायदेशीर सल्लागार ॲड. श्री. आर. एस. पालवे साहेब यांनी केलेल्या अमूल्य मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल जाहीर आभार मानतो. त्याचप्रमाणे मा. दादासाहेब नलावडे माजी नगराध्यक्ष अंबरनाथ नगरपरीषद, मा. श्री. सोनजे सर माजी मुख्याध्यापक महात्मा गांधी विद्यालय, अंबरनाथ, मा. श्री. रामराव मोरे सर माजी मुख्याध्यापक भाऊसाहेब परांजपे विद्यालय, तसेच पोलीस स्टेशन अंबरनाथ, बदलापूर व कल्याण व डोंबिवली यांनी वसुलीकामी विशेष सहकार्य केल्याबद्दल आभार. पतसंस्थेची संगणक कार्यप्रणाली कार्यान्वित करणारे नेटविन सिस्टीम्स ॲन्ड सॉफ्टवेअर आणि अधिकारी वर्ग, दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि., दि सारस्वत को. ऑप. बँक लि., डोंबिवली ना. सह. बँक लि., कल्याण जनता सह. बँक लि., शामराव विठ्ठल को-ऑप. बँक लि., अभ्युदय सहकारी बँक लि., अंबरनाथ जयहिंद को. ऑप. बँक लि., देना बँक लि., बँक ऑफ बडोदा, ठाणे जनता सहकारी बँक लि. तसेच कार्यक्षेत्रातील सर्व सह. पतसंस्था यांचे पदाधिकारी व कर्मचारी वर्गाचे सहकार्याबद्दल आभार.

अंतर्गत हिशोब तपासनीस मा. श्री. गिरीष कुलकर्णी व त्यांचे अधिकारी यांनी संस्थेच्या दैनंदिन कामकाजात वेळोवेळी मार्गदर्शन केल्याबद्दल मी खास ऋण व्यक्त करतो.

संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संचालक, कर्मचारी, ठेव प्रतिनिधी, सभासद, ठेवीदार आणि हितचिंतक यांनी दिलेले सहकार्य व प्रोत्साहन यामुळेच संस्थेने यशस्वी वाटचाल केली आहे या सर्वांचा मी व्यक्तिश: आभारी आहे.

जयहिंद ! जय सहकार !!

आपला

श्री. जयवंतराव बंडू काटकर (अध्यक्ष)

श्री महालक्ष्मी नागरी सह. पतपेढी मर्या. अंबरनाथ

## ताळेबंद

| रक्कम रु. २०१३-१४ | जबाबदाऱ्या व देणे | | रक्कम रु. २०१४-१५ |
|---|---|---|---|
| ५,००,००,०००.०० | **अधिकृत भाग भांडवल** | | ५,००,००,०००.०० |
| २०४,५१,१४०.०० | वसुल भाग भांडवल | | २,१८,५७,०५०.०० |
| ४७,३९,८५०.०० | **राखीव निधी** | | ५५,१३,७९८.०० |
| ६४,३३,६६०.०० | **इतर निधी** | | |
| ३३,६२,७८४.०० | इमारत निधी | ३४,५६,८८४.०० | |
| ७९,६९७.०० | लाभांश समीकरण निधी | ८९,६९७.०० | |
| ७८,०००.०० | सभासद कल्याण निधी | ८५,०००.०० | |
| ------- | गुंतवणूक चढ-उतार निधी | २५,०००.०० | |
| १,२५,०००.०० | रौप्य महोत्व निधी | ------- | |
| ३२,०००.०० | धर्मदाय निधी | ३२,०००.०० | |
| ४२,०००.०० | कर्मचारी कल्याण निधी | ५४,०००.०० | |
| ७०,०००.०० | निवडणूक निधी | १,००,०००.०० | |
| २०,९१,१७१.०० | संशयीत व बुडीत कर्ज निधी | २२,७६,१७१.०० | |
| १,६८,००८.०० | थकीत कर्ज व्याज निधी | १,९३,००८.०० | |
| ३,८५,०००.०० | उत्तम जिंदगी तरतुद | ४,१०,०००.०० | ६७,२१,७६०.०० |
| २१,९४,८०,९९४.०० | **ठेवी** | | |
| ९,२४,११,९५५.०० | मुदत ठेव | ९,५३,१६,३५९.०० | |
| १,०४,७८,१८९.०० | दामदुप्पट ठेव | १,००,८४,०५४.०० | |
| २,३१,१०,९६२.०० | मासिक मिळकत ठेव | २,९५,२१,९६३.०० | |
| ११,११,८६४.०० | ओंमकार ठेव | ७१,०३,२३१.०० | |
| ७,८६,९९,८१६.०० | दैनंदिन ठेव | ८,२४,०४,०३२.०० | |
| ३१,५५,६४६.०० | मासिक ठेव | ३८,३८,८७७.०० | |
| ३०,१७,५३६.०० | जनविकास ठेव | २८,५६,८१५.०० | |
| २,०८,२५०.०० | बालविकास ठेव | २,०८,७००.०० | |
| १,५३,८४८.०० | इच्छा पूर्ती ठेव | २,१८,५९३.०० | |
| १२,०२,८५२.०० | लखपती ठेव | १६,३४,९२७.०० | |
| ४८,३९,८१७.०० | बचत ठेव | ४१,९८,४४७.०० | |
| १,५५,२२१.०० | एजंट सुरक्षा ठेव | १,६३,२३२.०० | |
| १,२३,५००.०० | पेंशन ठेव | १,७१,२००.०० | |
| ९,०३८.०० | महिला कुंभ बचत ठेव | ९,०३८.०० | |
| २,५००.०० | दिर्घ मुदत ठेव | २,५००.०० | २३,७७,३१,९६८.०० |
| २५,११,०५,६४४.०० | एकूण बेरीज पुढील पानावर चालू | | २७,१८,२४,५७६.०० |

**श्री. प्रकाश शं. पाटील** (सचिव)

**श्री. जगदिश वि. मोरे** (खजिनदार)

## पत्रक (दि. ३१.०३.२०१५ अखेर)

| रक्कम रु. २०१३-१४ | मालमत्ता व येणे | | रक्कम रु. २०१४-१५ |
|---|---|---|---|
| १५,४४,१८९.०० | **रोख शिल्लक** | | ५,७२,५७३.०० |
| १,५५,६९,०८०.९१ | **बँक शिल्लक** | | ७९,९५,५७१.५८ |
| ६,७७,३४,०९७.०० | **गुंतवणूक** | | |
| ४,१००.०० | भाग | ५,०००.०० | |
| ४६,८७,३००.०० | राखीव निधी | ४६,८७,३००.०० | |
| ६,३०,४२,६९७.०० | मुदत ठेवी | ७,४१,०७,४७६.०० | ७,८७,९९,७७६.०० |
| १६,३०,३३,६५९.०० | **कर्जे** | | |
| | **विनातारणी कर्ज** | | |
| ६,१०,०३,१४०.०० | मध्यम मुदत कर्ज | ६,७२,६८,७१३.०० | |
| २,७३,३२४.०० | व्यवसाय कर्ज | २,८८,५२०.०० | |
| १,७०,५३०.०० | तातडीचे कर्ज | १,५१,६७०.०० | |
| १०,०४,६७८.०० | नाममात्र सभासद कर्ज | ९,८७,५६०.०० | |
| | **तारणी कर्ज** | | |
| ६,३७,०५,७२३.०० | गृहतारण कर्ज | ७,३६,५९,५०७.०० | |
| १,५६,७२,४२५.०० | सोने तारण कर्ज | १,७४,८३,४४५.०० | |
| ३५,४७,२०५.०० | वाहन तारण कर्ज | ४२,१४,२२९.०० | |
| १,६९,३९,३४८.०० | मुदत ठेव तारण कर्ज | १,८०,१३,४०५.०० | |
| २,४८,२७६.०० | दैनंदिव ठेव तारण कर्ज | २,३५,२७६.०० | |
| २,८१,५१०.०० | वस्तू खरेदी तारण कर्ज | २,७४,५१०.०० | |
| १,८७,५००.०० | एन्. एस. सी. तारण कर्ज | ९४,५००.०० | १८,२६,७१,३३५.०० |
| ८७,०४,३४९.०० | **स्थावर मालमत्ता (इमारत)** | | ८४,८६,७४०.०० |
| २३,४९,७२५.०० | **फर्निचर व डेडस्टॉक** | | २१,७८,०२२.०० |
| ३,२६,०१५.०० | **संगणक प्रणाली** | | ३,०७,२१२.०० |
| ३६,४१४.०० | **वाहन खरेदी** | | ३२,७७३.०० |
| २५,९२,९७,५२८.९१ | एकूण बेरीज पुढील पानावर चालू | | २८,१०,४४,००२.५८ |

एकूण बेरीज पुढील पानावर चालू

श्री. मनोहर पां. जाधव (उपाध्यक्ष) श्री. जयवंतराव बं. काटकर (अध्यक्ष)

## ताळेबंद

| रक्कम रु. २०१३-१४ | जबाबदाऱ्या व देणे | | रक्कम रु. २०१४-१५ |
|---|---|---|---|
| २५,११,०५,६४४.०० | मागील पानावरुन | | २७,१८,२४,५७६.०० |
| ७२,४१,४०६.०० | **देणी व तरतुदी** | | |
| ४६,०४,८९७.०० | देणे ठेवीवरील व्याज | ४८,६६,५८५.०० | |
| १,३१,०००.०० | देणे ऑडीट फी | १,००,०००.०० | |
| २,२५,०००.०० | देणे सानुग्रह अनुदान | २,२५,०००.०० | |
| ९,३९,४३८.०० | देणे कर्मचारी भविष्य नि. निधी | ११,२८,८७३.०० | |
| ३०,०००.०० | देणे व्यवसाय कर | ३०,०००.०० | |
| ५२५.०० | देणे निवडणूक अनामत | ५२५.०० | |
| १०,३९,९५८.०० | देणे लाभांश | १०,६५,४३४.०० | |
| ५०००.०० | देणे शिक्षण निधी | ५,०००.०० | |
| ९३,६६०.०० | देणे अनामत | २,८३,०१५.०० | |
| ३८,०३०.०० | देणे टि.डी.एस्. | ८१,८६९.०० | |
| ३६,७९८.०० | देणे ॲडव्हाँस मुक्ताई सागर पतसंस्था | ३६,७९८.०० | |
| ९०,०००.०० | देणे अंतर्गत लेखा प. फी. | १,०२,१८१.०० | |
| ७,१००.०० | देणे ॲडव्हांन्स | ------ | |
| | | | ७९,२५,२८०.०० |
| २६,१०,९५५.९१ | **नफा** | | |
| ३६९.५२ | शिल्लक नफा (सन १३-१४) | ८००.९१ | |
| २६,१०,५८६.३९ | चालु नफा (सन १४-१५) | २८,५५,८५१.६७ | |
| | | | २८,५६,६५२.५८ |
| २६,०१,५८,००५.९१ | एकूण | | २८,२६,०६,५०८.५८ |

**श्री. प्रकाश शं. पाटील** (सचिव) **श्री. जगदिश वि. मीरे** (खजिनदार)

## पत्रक (दि. ३१.०३.२०१५ अखेर)

| रक्कम रु. २०१३-१४ | मालमत्ता व येणे | रक्कम रु. २०१४-१५ |
|---|---|---|
| २५,९२,९७,५२८.९१ | **मागील पानावरुन** | २८,१०,४४,००२.५८ |
| २,८०,०००.०० | कार्यालय डिपॉझिट | २,८०,०००.०० |
| ३,०५,०००.०० | स्टेशनरी साठा | २,५५,०००.०० |
| ९,५००.०० | टेलिफोन अनामत | ९,५००.०० |
| १,६६०.०० | वीज अनामत | १,९५०.०० |
| २९,०६०.०० | मुद्रांक शुल्क | २३,१६०.०० |
| ५,०००.०० | बी. इ. एस्.टी. अनामत | ५,०००.०० |
|  | येणे १०१ कारवाई खर्च | ७४८.०० |
| १५,६७९.०० | सभासद विमा | ७,७१७.०० |
| २,४०,६१०.०० | इन्कम टॅक्स | ४,८०,८२२.०० |
| ३,२२,८९३.०० | येणे ॲडव्हांस | ३,१५,७९३.०० |
| ४,५०,७०२.०० | येणे गुंतवणुकीवरील व्याज | १,८०,५९३.०० |
| ३७३.०० | येणे बँक टि.डी.एस्. | ३७३.०० |
| ---- | भारत गॅस डिपॉझिट | १८५०.०० |
| २६,०९,५८,००५.९१ | एकूण | २८,२६,०६,५०८.५८ |

**श्री. मनीहर पां. जाधव** (उपाध्यक्ष) **श्री. जयवंतराव बं. काटकर** (अध्यक्ष)

# उत्पन्न - खर्च पत्रक

दिनांक : १/४/२०१४ ते ३१/३/२०१५ अखेर

| रक्कम रुपये २०१३-१४ | खर्च | | रक्कम रुपये २०१४-१५ |
|---|---|---|---|
| | **अ) व्याज खर्च** | | |
| १,५०,८०,२५९.०० | १) ठेवीवरील व्याज | १,७२,८४,१९४.०० | |
| ४९,५१७.०० | २) बँक कर्ज व्याज | --------- | |
| ४२,९९१.०० | ३) बँक चार्जेस | ३२,७८५.१७ | |
| ४२,७४,१७२.०० | ४) दैनंदिन ठेव कमिशन | ४४,६४,७१२.०० | २,१७,८१,६९१.३३ |
| | **ब) व्यवस्थापकीय खर्च (ब-१)** | | |
| २७,४०,०४३.०० | १) सेवक पगार | २१,९०,०६७.०० | |
| ३७,३६६.०० | २) सहकार प्रशिक्षण खर्च | ७,९७५.०० | |
| ५५,८७५.०० | ३) कर्मचारी गणवेश | १६,०८०.०० | |
| १०००.०० | ४) सहकार कल्याण निधी | | २२,१४,१२२.०० |
| | **ब) -२** | | |
| ११,१७८.०० | १) पोस्टेज खर्च | १४,९४०.०० | |
| ४०,६०५.०० | २) स्थावर मालमत्ता विमा खर्च | ४३,४१४.०० | |
| १,६९,१६५.०० | ३) संगणक/इन्व्हरर्टर देखभाल दुरुस्ती | १,२६,५५०.०० | |
| १,०१,७८०.०० | ४) वीज बील | १,१३,३६३.०० | |
| ५३,७५४.०० | ५) टेलीफोन बिल | १,२१,२८३.०० | |
| १,७१,५३०.०० | ६) कार्यालय भाडे | २,०३,१३०.०० | |
| १०,५२६.०० | ७) मालमत्ता कर | २२,६१२.०० | |
| ६५०.०० | ८) इलेक्ट्रीक मेंटनंस/पाणीबील | १,६६३.०० | ६,४६,९५५.०० |
| | **ब) - ३** | | |
| १,०७,०००.०० | १) अंतर्गत लेखा परिक्षण फी | १,००,०००.०० | |
| १,४३,९५३.०० | २) शासकिय लेखा परिक्षण फी | १,२२,३४९.०० | |
| १६,०००.०० | ३) गुमास्ता लायसन / ट्रेड सर्टिफिकेट फी | २,१६०.०० | |
| ३,२९७.०० | ४) टि.डी.एस. रिटर्न चार्जेस | ------- | |
| ---- | ५) टि.डी.एस. लेट फी | २७,१५७.०० | |
| ---- | ६) टि.डी.एस. | १,१५२.०० | |
| २,३१,१०,६८१.६१ | एकूण बेरीज पुढील पानावर चालू | | २,४६,४२,७६८.३३ |

**श्री. प्रकाश शं. पाटील (सचिव)** **श्री. जगदिश वि. मीरे (खजिनदार)**

# उत्पन्न - खर्च पत्रक

दिनांक : १/४/२०१४ ते ३१/३/२०१५ अखेर

| रक्कम रुपये २०१३-१४ | उत्पन्न | | रक्कम रुपये २०१४-१५ |
|---|---|---|---|
| | **क) मिळालेले व्याज** | | |
| २,१६,६७,९४४.०० | १) कर्ज व्याज वसुल | २,२३,४२,७२८.०० | |
| ५५,३८,२७०.०० | २) बँक गुंतवणूक व्याज | ७३,६२,७०९.०० | |
| १५.०० | ४) लाभांश बँक | १५.०० | |
| | | | २,९७,०५,४५२.०० |
| | **ख) इतर उत्पन्न** | | |
| ६४,५५०.०० | १) नोटीस फी | ४९,३००.०० | |
| २५६,९३३.०० | २) प्रोसेसिंग फी | ३,५१,७१३.०० | |
| ८८,२६८.०० | ३) सेवा शुल्क | ७६,६६०.०० | |
| ३५,०७८.०० | ४) १०१ कारवाई खर्च वसूल | ---- | |
| १६,४२,९०९.०० | ५) मालमत्ता विक्री जमा | ---- | |
| | | | ४,७७,६७३.०० |
| २,९२,९३,९६७.०० | एकूण बेरीज पुढील पानावर चालू | | ३,०१,८३,१२५.०० |

**श्री. मनोहर पां. जाधव** (उपाध्यक्ष) **श्री. जयवंतराव बं. काटकर** (अध्यक्ष)

## उत्पन्न - खर्च पत्रक

दिनांक : १/४/२०१४ ते ३१/३/२०१५ अखेर

| रक्कम रुपये २०१३-१४ | खर्च | | रक्कम रुपये २०१४-१५ |
|---|---|---|---|
| २,३१,१०,६८१.६१ | मागील पानावरून | | २,४६,४२,७६८.३३ |
| | ७) सॉफ्टवेअर सर्व्हीस चार्जेस | २,८७,८१३.०० | ५,४०,६३१.०० |
| | **ब) - ४ घसारा खर्च** | | |
| १,०१,५८३.०० | १) स्थावर मालमत्ता | २,१७,६०९.०० | |
| २,६१,०८२.०० | २) फर्निचर व फिक्चर | २,४२,००३.०० | |
| ८१,५०४.०० | ३) संगणक | ७६,८०३.०० | |
| ४,०४६.०० | ४) वाहन | ३,६४१.०० | ५,४०,०५६.०० |
| | **क) छपाई, जाहीरात व देणगी खर्च** | | |
| १४,५५५.०० | १) सामाजिक उपक्रम | ४७,५३०.०० | |
| १५,५७८.०० | २) जाहीरात खर्च | ८,८४०.०० | |
| १,८५,०५९.०० | ३) छपाई लेखन साहीत्य | १,६९,०६२.०० | |
| ४०००.०० | ४) महा. राज्य. पत. फेड. वर्गणी | ---- | |
| २५,०००.०० | ५) ठाणे जि. ना./प.सह.पत.फेड. देणगी | ३,०००.०० | |
| २५,०००.०० | ६) मुख्यमंत्री सहा. निधी (दुष्काळ) | ---- | २,२८,४३२.०० |
| | **ड) इतर खर्च** | | |
| ८,९५०.०० | १) मासिक सभा भत्ता | ५२,५००.०० | |
| ६९,९२१.०० | २) वार्षिक सर्वसाधारण सभा (अहवाल छपाईसह) | ७६,६२२.०० | |
| ३,०००.०० | ३) सचिव मानधन | ३,०००.०० | १,३२,१२२.०० |
| | **ड-२)** | | |
| ८७,३९९.०० | १) किरकोळ खर्च | ९४,०९२.०० | |
| ३३,४५७.०० | २) प्रवास खर्च | २८,७००.०० | |
| २४,४२८.०० | ३) कर्ज वसुली खर्च | १७,२२७.०० | |
| ९,२०९.०० | ४) वाहन मेंटनंस | ३,०८६.०० | |
| २१,६५५.०० | ५) रक्कम चोरी (निर्लेखित) | ---- | |
| | | | १,४३,१०५.०० |
| २,४०,८६,१०७.६१ | एकूण | | २,६२,२७,११४.३३ |

**श्री. प्रकाश शं. पाटील** (सचिव)          **श्री. जगदिश वि. मोरे** (खजिनदार)

# उत्पन्न - खर्च पत्रक

दिनांक : १/४/२०१४ ते ३१/३/२०१५ अखेर

| रक्कम रुपये २०१३-१४ | उत्पन्न | रक्कम रुपये २०१४-१५ |
|---|---|---|
| २,९२,९३,९६७.०० | मागील पानावरुन | ३,०१,८३,१२५.०० |
| २,९२,९३,९६७.०० | एकूण | ३,०१,८३,१२५.०० |

श्री. मनोहर पां. जाधव (उपाध्यक्ष) श्री. जयवंतराव बं. काटकर (अध्यक्ष)

## उत्पन्न - खर्च पत्रक

दिनांक : १/४/२०१४ ते ३१/३/२०१५ अखेर

| रक्कम रुपये २०१३-१४ | खर्च | | रक्कम रुपये २०१४-१५ |
|---|---|---|---|
| २,४०,८६,१०७.६१ | मागील पानावरून | | २,६२,२७,११४.३३ |
| | ड-३) | | |
| ३१,५५५.०० | १) दसरा / लक्ष्मीपुजन खर्च | ४१,६२८.०० | |
| ४९,८६५.०० | २) रौप्यमहोत्सवी वर्ष खर्च | ३,६२,६३९.०० | |
| ४०,६४१.०० | ३) वर्धापन दिन खर्च | ---- | |
| १,६६,२३७.०० | ४) ऑफिस मेंटनंस खर्च | १,१२,२६९.०० | |
| | | | ५,१६,५३६.०० |
| | इ) तरतुदी | | |
| १,५०,६११.०० | १) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी | १,०९,१७०.०० | |
| ७४,०२०.०० | २) कर्म. भ. नि. निधी व्याज | ७७,५१३.०० | |
| २,७६,४२७.०० | ३) सानुग्रह अनुदान | २,४१,९४०.०० | |
| ५,०००.०० | ४) शिक्षण निधी | ---- | |
| ५०,०००.०० | ५) संशयीत व बुडीत कर्ज निधी | १,०५,०००.०० | |
| २०,०००.०० | ६) संशयीत व बुडीत कर्ज व्याज | २५,०००.०० | |
| २०,०००.०० | ७) उत्तम जिंदगी तरदुद | २५,०००.०० | |
| १७,१२,९०९.०० | ८) इमारत निधी तरतुद | ---- | |
| | | | ५,८३,६२३.०० |
| | ई) नफा | | |
| २६,१०,५८६.३९ | शिल्लक नफा ताळेबंदाकडे वर्ग | | २८,५५,८५१.६७ |
| २,९२,९३,९६७.०० | एकूण | | ३,०१,८३,९२५.०० |

श्री. प्रकाश शं. पाटील (सचिव) श्री. जगदिश वि. मीरे (खजिनदार)

## उत्पन्न - खर्च पत्रक

दिनांक : १/४/२०१४ ते ३१/३/२०१५ अखेर

| रक्कम रुपये २०१३-१४ | उत्पन्न | रक्कम रुपये २०१४-१५ |
|---|---|---|
| २,९२,९३,९६७.०० | मागील पानावरुन | ३,०१,८३,१२५.०० |
| २,९२,९३,९६७.०० | एकूण | ३,०१,८३,१२५.०० |

श्री. मनोहर पां. जाधव (उपाध्यक्ष) श्री. जयवंतराव बं. काटकर (अध्यक्ष)

# सन २०१५-१६ चे अंदाज पत्रक

मागील सन २०१४-१५ या वर्षाचा अंदाज व प्रत्यक्ष साध्य दर्शवुन पुढील सन २०१५-१६ चे अंदाज पत्रक आपल्या मंजुरीसाठी ठेवताना आम्हांस अत्यानंद होत आहे. तसेच अंदाजपत्रकीय मंजुरीपेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजूरी मिळावी ही विनंती.

| अ. क्र. | तपशील | सन २०१४-२०१५ चा | | २०१५-२०१६ चा अंदाज |
|---|---|---|---|---|
| | | अंदाज | साध्य | |
| | **जबाबदाऱ्या व देणी** | | | |
| १) | वसूल भाग भांडवल | २,१५,००,०००.०० | २,१८,५७,०५०.०० | २,४०,७०,०००.०० |
| २) | राखीव व इतर निधी | १,२०,००,०००.०० | १,२२,३५,५४८.०० | १,३७,००,०००.०० |
| ३) | सभासद ठेवी | २५,५०,००,०००.०० | २३,७७,३१,९६८.०० | २६,२५,००,०००.०० |
| ४) | इतर देणी व तरतुदी | ७५,००,०००.०० | ७९,२५,२८०.०० | ९५,००,०००.०० |
| ५) | एकुण नफा | ३०,००,०००.०० | २८,५६,६५२.५८ | ३२,००,०००.०० |
| | एकूण | २९,९०,००,०००.०० | २८,२६,०६,५०८.५८ | ३१,२९,७०,०००.०० |
| | **मालमत्ता व येणी** | | | |
| ६) | रोख व बँक शिल्लक | १,७६,००,०००.०० | ८५,६८,१४४.५८ | १,२७,७०,०००.०० |
| ७) | गुंतवणूक | ७,९०,५०,०००.०० | ७,८७,९९,७७६.०० | ८,५०,००,०००.०० |
| ८) | सभासद कर्जे | १८,८७,००,०००.०० | १८,२६,७१,३३५.०० | २०,२५,००,०००.०० |
| ९) | कायम व इतर मालमत्ता | १२९,०२,०००.०० | १,१५,५६,१९७.०० | १,२०,००,०००.०० |
| १०) | इतर येणी | ७,४८,०००.०० | १०,११,०५६.०० | ७,००,०००.०० |
| | एकूण | २९,९०,००,०००.०० | २८,२६,०६,५०८.५८ | ३१,२९,७०,०००.०० |
| | **उत्पन्न** | | | |
| ११) | सभासद कर्ज व्याज | २,५४,४५,०००.०० | २,२३,४२,७२८.०० | २,५५,५०,०००.०० |
| १२) | बँक गुंतवणुक व्याज | ५८,२४,५००.०० | ७३,६२,७२४.०० | ७५,००,०००.०० |
| १३) | इतर उत्पन्न | ५,२५,३००.०० | ४,७७,६७३.०० | ५,२५,०००.०० |
| | एकूण | ३,१७,९४,८००.०० | ३,०१,८३,९२५.०० | ३,३५,७५,०००.०० |
| | **खर्च** | | | |
| १४) | सभासद ठेव व्याज | १,७७,१८,५००.०० | १,७२,८४,१९४.१६ | १,९२,३५,०००.०० |
| १५) | कर्मचारी वेतन व भत्ते | २३,४०,०००.०० | २१,९०,०६७.०० | २६,००,०००.०० |
| १६) | दै. ठेव कमिशन - प्रतिनिधी | ४७,७५,९२०.०० | ४४,६४,७१२.०० | ४७,००,०००.०० |
| १७) | बँक कर्ज व्याज व चार्जेस | ५५,०००.०० | ३२,७८५.१७ | ४५,०००.०० |
| १८) | सहकार प्रशिक्षण खर्च | ४७,१८०.०० | ७,९७५.०० | १५,०००.०० |
| १९) | कर्मचारी गणवेश | ३५,०००.०० | १६,०८०.०० | ६५,०००.०० |
| २०) | राज्य / जिल्हा सह.पत.फेड. वर्गणी | ४,०००.०० | ३,०००.०० | ३,०००.०० |
| | एकूण बेरीज पुढील पानावर चालू | २,४९,७५,६००.०० | २,३९,९८,८१३.३३ | २,६६,६३,०००.०० |

श्री. प्रकाश शं. पाटील
सचिव

श्री. जगदिश वि मोरे
खजिनदार

श्री. मनोहर पां. जाधव
उपाध्यक्ष

श्री. जयवंतराव बं. काटकर
अध्यक्ष

| अ. क्र. | तपशील | सन २०१४-२०१५ चा अंदाज | सन २०१४-२०१५ चा साध्य | २०१५-२०१६ चा अंदाज |
|---|---|---|---|---|
| | मागील पानावरुन क्रमशः... | २,४१,७५,६००.०० | २,३१,९८,८९३.३३ | २,६६,६३,०००.०० |
| २१) | पोस्टेज टेलीग्राम | ३५,०००.०० | १४,९४०.०० | २०,०००.०० |
| २२) | स्थावर मालमत्ता विमा खर्च | ४५,०००.०० | ४३,४१४.०० | ४४,०००.०० |
| २३) | संगणक/इन्हर्टर/वाहन/देखभाल दुरूस्ती | २,००,०००.०० | १,३०,१७६.०० | २,००,०००.०० |
| २४) | वीज बील | १,२५,०००.०० | १,१३,३६३.०० | १,३०,०००.०० |
| २५) | टेलीफोन बील | ६४,०००.०० | * १,२१,२८३.०० | १,३०,०००.०० |
| २६) | कार्यालय भाडे | २,१५,०००.०० | २,०३,१३०.०० | २,५०,०००.०० |
| २७) | मालमत्ता कर | २०,०००.०० | २२,६१२.०० | ३०,०००.०० |
| २८) | पाणी बील | ८,०००.०० | ११२३.०० | ५,०००.०० |
| २९) | शासकीय/अंतर्गत लेखापरिक्षण फी/ टी.डी.एस. रिटर्न चार्जेस | ३,००,०००.०० | २,५०,६५८.०० | ३,००,०००.०० |
| ३०) | जाहीरात / सामाजिक उपक्रम | १,७५,०००.०० | ५६,३७०.०० | ६०,०००.०० |
| ३१) | छपाई लेखन साहित्य | ३,२५,०००.०० | १,६९,०६२.०० | ३,५०,०००.०० |
| ३२) | मासिक / वार्षिक सर्वसाधारण सभा | १,८७,२००.०० | १,२९,१२२.०० | १,५०,०००.०० |
| ३३) | सचिव मानधन | ३,०००.०० | ३,०००.०० | ३,०००.०० |
| ३४) | फिरकोळ खर्च | १,००,०००.०० | ९४,०९२.०० | १,१५,०००.०० |
| ३५) | प्रवास / कर्ज वसुली खर्च | ७०,०००.०० | ४५,९२७.०० | ६५,०००.०० |
| ३६) | दसरा / लक्ष्मीपुजन खर्च / पूजा खर्च | ५०,०००.०० | ४१,६२८.०० | ५०,०००.०० |
| ३७) | ऑफिस मेंटनन्स खर्च | १,९०,०००.०० | १,१२,२६९.०० | १,७०,०००.०० |
| ३८) | ट्रेड सर्टिफिकेट | ६,०००.०० | २,१६०.०० | २०,०००.०० |
| ३९) | घसारा | ६,०५,०००.०० | ५,४०,०५६.०० | ५,५०,०००.०० |
| ४०) | तरतुदी | ८,५०,०००.०० | ५,८३,६२३.०० | ७,५०,०००.०० |
| ४१) | सभासद कल्याण निधी | १०००.०० | --- | --- |
| ४२) | रौप्य महोत्सवी वर्ष खर्च | २,००,०००.०० | * ३,६२,६३९.०० | --- |
| ४३) | वर्धापन दिन खर्च | ४५,०००.०० | --- | --- |
| ४४) | सॉफ्टवेअर सर्व्हीस चार्जेस | --- | * २,८७,८१३.०० | ३,२०,०००.०० |
| | नफा | ३०,००,०००.०० | २८,५५,८५१.६७ | ३२,००,०००.०० |
| | एकुण | ३,१७,१४,८००.०० | ३,०१,८३,१२५.०० | ३,३५,७५,०००.०० |

| श्री. प्रकाश शं. पाटील | श्री. जगदिश वि. मोरे | श्री. मनोहर पां. जाधव | श्री. जयवंतराव बं. काटकर |
|---|---|---|---|
| सचिव | खजिनदार | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

## परिशिष्ट "अ"

(रुपये लाखात)

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नाव | : | **श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या., अंबरनाथ** |
| प्रशासकीय कार्यालय | : | १०१/१०२ साकेत अपार्टमेंट, पहिला माळा, रोटरी क्लब समोर, वडवली विभाग, अंबरनाथ (पूर्व), जि. ठाणे. |
| नोंदणी क्र. | : | टि. एन्.ए./ यु.एल.आर./आर.एस.आर. (सी.आर.)/ ३७४/१९८९-९० |
| नोदंणी दिनांक | : | २८ ऑगस्ट १९८९ |
| संस्थेचे कार्यक्षेत्र | : | ठाणे जिल्हा मर्यादित |
| शाखा | : | प्रशासकीय कार्यालयासह पाच शाखा<br>१) अंबरनाथ २) बदलापूर<br>३) डोंबिवली ४) कल्याण<br>५) टिटवाळा |
| सभासद संख्या | : | ४०७१ |
| वसूल भाग भांडवल | : | २१८.८२ |
| राखीव व इतर निधी | : | १२३.३५ |
| ठेवी | : | २३७७.३८ |
| कर्जे | : | १८२६.७१ |
| गुंतवणुक | : | ७८७.९९ |
| थकबाकी शेकडाप्रमाण | : | ५.१७% |
| निव्वळ एन्. पी. ए. | : | ३.३३% |
| ऑडीट वर्ग | : | अ |
| अहवाल साली नफा | : | २८.५६ |
| कर्मचारी वर्ग | : | २१ |
| खेळते भांडवल | : | २९.२६ |

## अंतर्गत लेखा परिक्षकांचा अहवाल

आम्ही श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ या संस्थेच्या सोबत जोडलेल्या सन २०१४-२०१५ च्या तेरीज, उत्पन्न-खर्च पत्रक व ताळेबंदाचे लेखा परिक्षण केले असून अहवाल करतो की,

१) आमच्या लेखा परिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती माहिती व खुलासे उपलब्ध करुन दिलेले आहेत.

२) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल त्यावरुन संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थाचा १९६० चा कायदा व नियम आणि संस्थेच्या पोटनियमान्वये अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

३) आम्ही तपासलेले तेरीज, उत्पन्न-खर्च पत्रक व ताळेबंद संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकांशी व विवरण पत्रांशी जुळत आहेत.

४) आमच्या मते आमच्या संपूर्ण माहितीप्रमाणे तसेच आम्हाला देण्यात आलेल्या खुलाशावरुन हे हिशोब महाराष्ट्र सहकारी संस्थांचा सन १९६० चा कायदा व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी माहिती देतात.

स्थळ : अंबरनाथ
दिनांक : २८.०७.२०१५

सही /-
**श्री. जी. डी. कुलकर्णी**
**ॲण्ड असोसिएटस्**
(चार्टर्ड अकाऊंटंट)

## शासकीय लेखा परिक्षकांचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा कलम ८१ (५ ब)
आणि महाराष्ट्र सहकारी संस्थाचा नियम १९६९ अन्वये द्यावयचा)

मी श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ या संस्थेच्या सोबत जोडलेला ३१-०३-२०१५ या दिनांकाचा ताळेबंद व सन २०१४-२०१५ या सहकारी वर्षाचे नफा/ तोटा पत्र तपासले असून अहवाल करीतो की,

१) माझ्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खालील प्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत.

२) माझ्या मते व मला मिळालेल्या माहिती व खुलाशाचे आधारे
(अ) ताळेबंद व नफा / तोटा पत्रक संस्थेने ठेवलेल्या हिशोबी पुस्तकाशी जुळते असून सदर ३१.०३.२०१५ या दिनांकाचा ताळेबंद संस्थेच्या व्यवहाराची (कामकाजाची) सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो आणि नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याचे/तोट्याची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो.

३) माझ्या मते संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा, नियम व संस्थेचे पोटनियम यानुसार आवश्यक असणारी हिशोबी पुस्तके योग्य त्या रितीने ठेवलेली आहेत.

४) सन २०१४-२०१५ या सहकारी वर्षासाठी संस्थेस लेखापरिक्षण वर्ग ***'अ'*** देण्यात आला आहे.

स्थळ : अंबरनाथ
दिनांक : ३१.०७.२०१५

सही/-
**मे. श्रीपाद कुलकर्णी** (C.A.)
(सनदी लेखापाल)

## ※ सभासदांसाठी मार्गदर्शक सूचना व नियम ※

१) ज्या व्यक्तील संस्थेत खाते उघडावयाचे असेल अशा व्यक्तीने दोन पासपोर्ट साईज फोटो व वास्तवाच्याचा शासनमान्य पुरावा देणे आवश्यक आहे.

२) कोणत्याही प्रकारच्या कर्जासाठी अर्जदार सभासदाला किमान दोन जमीनदारांची आवश्यकता आहे. पैकी एक सरकारी नोकर असावा. (ही अट ठेव तारण कर्ज, सोने तारण कर्ज व शासकीय प्रमाणपत्र तारण कर्ज या कर्जास लागू नाही.)

३) कर्जदार किंवा त्यांचे जमीनदार कोणत्याही प्रकारचे थकबाकीदार असता कामा नये.

४) कर्ज अर्ज सादर करतेवेळी अर्जदार व जामीनदारांनी आपले पगारपत्रक, उत्पन्नाचा दाखला, रेशनिंग कार्ड प्रत, विद्युत बिल, घरभाडे पावती, आधारकार्ड, पासपोर्ट आकाराचा फोटो ही कागदपत्रे सोबत जोडली पाहिजेत व तारण कर्जाविषयी तारण मालमत्तेची आवश्यक ती सर्व कागदपत्रे किंवा व्यवस्थापक / शाखाधिकारी जी कामदपत्रे मागतील ती दिली पाहीजेत.

५) प्रत्येक कर्ज हप्ता भरतेवेळी सभासदाने आपले कर्ज पासबूक आणून त्याची नोंद वेळेवेळी करून घेणे आवश्यक आहे. पास बुकाशिवाय आर्थिक व्यवहार हाताळला जाणार नाही.

६) कर्जदाराने कर्जाचे हप्ते, ठरवुन दिलेल्या तारखेच्या आत भरावेत. त्यानंतर येणाऱ्या हप्त्यावर थकबाकीच्या २% इतकी रक्कम दंडव्याज म्हणुन आकारण्यात येईल.

७) संस्थेचे सभासद छोटेमोठे व्यवसाय करतात अशा व्यवसायिक सभासदांकडून दैनंदिन ठेव स्विकारण्यात येते. त्या ठेवीदारांकडून व्यवसायाकरीता कर्ज मागणी अर्ज आल्यास त्यांची संस्थेमध्ये असलेली दैनंदिन ठेव, धारण केलेले भाग व दिलेले तारण या बाबींचा विचार करून, जास्तीत जास्त कर्ज मंजूर करण्यात येते.

८) संस्थेने कार्यान्वित केलेल्या विविध कर्ज व ठेव योजनांचा प्रत्येक सभासदाने लाभ घ्यावा.

९) संस्थेकडून केवळ कर्ज काढणे हा उद्देशन ठेवु नका, तर आपल्या मिळकतीतुन नियमित काही बचत करण्याची सवय लावुन घ्या व संस्थेच्या व आपल्या उन्नतीस हातभार लावा. प्रत्येक सभासदाने देण्याघेण्याचा व्यवहार करतेवेळी पासबुक सोबत आणणे अत्यावश्यक आहे.

१०) संस्था वैयक्तिक जामिनकी, वाहन तारण, गृहतारण, सोनेतारण, राष्ट्रीय बचत प्रमापत्र तारण, किसान विकास प्रमाणपत्र तारण, विमा पॉलीसी तारण, मुदत ठेव तारण, व्यवसाय कर्ज इत्यादी प्रकारची कर्ज देत आहे. अधिक माहीतीसाठी व्यवस्थापक / शाखाधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

११) कर्ज मागणी अर्ज करताना सभासदाने आपण दुसऱ्या थकबाकीदारास जामीन नाही याची खात्री करून घेतल्यानंतर अर्ज सादर करावा.

१२) कर्ज घेण्याचे कारण व जामीनदारांची पात्रता विचारात घेऊन सभासदास कर्ज मंजुर करण्यात येते.

१३) थकबाकीदारांनी प्राथमिक नोटीस मिळताच, संस्थेशी संपर्क साधुन सहकार्य करावे व न्यायालयीन कारवाईतून होणारी असुविधा टाळावी अन्यथा वकील फी न्यायालयीन खर्च इत्यादी खर्चास पात्र व्हाल.

१४) कर्जदाराने आपले हप्ते नियमित भरावेत आणि जामीनदारांनी आपण जामीन असलेल्या व्यक्ती कर्जाचे हप्ते नियमित भरतात की नाही याची वेळेवेळी चौकशी करणे आवश्यक आहे.

१५) सभासदांनी बदललेला राहण्याचा पत्ता, नोकरी व व्यवसायाचा पत्ता, बदललेले नांव किंवा बदललेला कायदेशीर वारस वेळच्यावेळी संस्थेला कळविला पाहिजे.

१६) संस्थेकडे जमा असणाऱ्या ठेवीवर कर्ज हवे असल्यास, ठेवीच्या जमा रकमेवर ९०% कर्ज ठेवीच्या व्याजदरापेक्षा २% अधिक व्याजदराने त्वरीत मिळू शकेल.

१७) ज्या सभासदांचे बचत खाते संस्थेत नाही अशा सभादसांनी ती उघडून घ्यावी, जेणेकरून आपला लाभांश त्यामध्ये जमा करणे शक्य होईल.

१८) ज्या सभासदांनी सन २०११-१२ चा लाभांश घेतला नसल्यास घेणे अन्यथा तो राखीव निधीत जमा केला जाईल याची नोंद घ्यावी.

१९) पतसंस्थेच्या प्रत्येक ग्राहकाने आपला मोबाईल क्र. पतसंस्थेस द्यावा जेणेकरुन सदर मोबाईल क्र. आपल्या खात्याशी सलग्न करता येईल.

२०) वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांच्या १० वी, १२ वी व पदवी परिक्षा प्रथम प्रयत्नात पास झालेल्या मुलांचा सत्कार आयोजित केला आहे. त्यासाठी अशा विद्यार्थ्यांची नावे संस्थेच्या कार्यालयात त्यांच्या प्रमाणपत्राच्या प्रतीसह दिनांक १७.०८.२०१५ पुर्वी नोंदणे आवश्यक आहे.

## * कर्मचारी *

श्री. सुनिल ह. घनवट
श्री. सचिन म. मोर्ये
सौ. सुनंदा वि. जरारे
सौ. रजनी स. मोर्ये
कु. साधना वि. शेंडे
कु. मयुरी ल. भोसले

श्री. आनंदा वि. पाटील
सौ. अनिता प्र. भोसले
सौ. वैशाली द. घाडगे
कु. अपर्णा बा. पाटील
श्री. तुषार र. मेहर

सौ. मधुरा म. दाबके
श्री. नाथा बा. लोटके
सौ. रश्मी रा. विचारे
सौ. प्रविणा दि. जोशी
सौ. रत्ना म. उंबरे

श्री. पांडूरंग श्री. पाटील
श्री. संतोष श्री. पाटील
सौ. मनिषा ज. जाधव
सौ. स्नेहा सु. भोगांवकर
सौ. प्रिया सं. कवठेकर

## * कायदेविषयक सल्लागार *

**श्री. राजेंद्र एस्. पालवे**

B.Com., G.D.C.&A., LL.M. (Advocate High Court)

## * दैनंदिन / मासिक ठेव प्रतिनिधी *

**अंबरनाथ शाखा :**

| | |
|---|---|
| सौ.निवेदिता विलास शिंदे | मो. ७७५८०३५९०० |
| श्री.हरिष देवजी चिकणे | मो. ०९४२२६६७५३६ |
| सौ. माधुरी मनोहर जाधव | मो. ९४२३०८८४६५ |
| श्री.बापूराव भिमराव मेश्राम | मो. : ९८२२५१०३२२ |
| सौ. सुषमा हरिश्चंद्र येरूणकर | ✆ : २६०१५९५ |
| श्री. विश्वास तुकाराम शेंडे | -------- |
| श्री. प्रदिप शंकर भोसले | मो. ८१४९०७०९९८ |
| सौ. मिना यादव भोर | मो. ९९७५०९०१०५ |
| श्री. रमेश लक्ष्मण रावल | मो. ९३२३८८३५६१ |
| सौ. कविता निर्मल जैन | मो. ९३२०७१९५१९ |
| श्री. प्रशांत हणमंत घनवट | मो. ७७४४८९५८५७ |
| सौ. जयश्री संजय पवार | मो. ९०२८६५७८२१ |
| श्री. दत्ताराम विश्राम घाडगे | मो. ९८५०७३५१६४ |
| श्री. सिद्धेश सुनिल भोगांवकर | मो. ९७५७१७२१५६ |

**डोंबिवली शाखा :**

| | |
|---|---|
| सौ. रजनी आ. धायगुडे | मो. ९८९२६५४६९३ |
| सौ. उषा भास्कर दाबके | ✆ : ५३६१४४६ |
| श्री. संजय अंकुश पाटील | मो. ९३२४०११४४७ |
| सौ. विद्या भा. कातरणे | मो. ९९३०८५२४६० |
| सौ. रेखा प्र. पवार | मो. ८०९७०२९०७२ |

**बदलापूर शाखा :**

| | |
|---|---|
| सौ. स्नेहल जगदीश मोरे | मो. ९४२३३६७५२२ |
| सौ. गितांजली जयवंत पाटील | मो. ९८८१९६५०४७ |
| सौ. स्याती कैलास पाटील | मो. ९०९६४४२५८६ |
| श्री. सुभाष अरुण देशमुख | मो. ९८२२४४७१८६ |
| श्री. अरूण ओंकार पाटील | मो. ९३२४०६४३८७ |
| श्री. दिनेश विष्णू सपाटे | मो. ९९६००२३९७१ |
| सौ. रुपाली चं. देसाई | मो. ९३२३०४९३७२ |
| श्री. सुभाष दादा कदम | मो. ८०८७३९३८३० |
| सौ. स्मिता विजय पाटील | मो. ७७९८१३१८९२ |
| सौ. रंजना संतोष पाटील | मो. ९८९०५७२५२७ |
| श्री. समीर ज. मिरकुटे | मो. ९१७५३४३३२४ |
| सौ. नंदा पां. पाटील | मो. ९८६००६०६८६ |

**कल्याण शाखा :**

| | |
|---|---|
| श्री. प्रसाद सुरेश एखंडे | मो. ८६५५०८८९९९ |
| श्री. सुनिल भागोजी सावंत | -------- |
| श्री. शिवाजी शामराव देशमुख | मो. ८४५४८८१२१९ |
| श्री. संतोष धोंडीराम कदम | मो. ९८३३७५९१२३ |
| श्री. प्रशांत भ. उतेकर | मो. ८१४९६६१६७६ |

**टिटवाळा शाखा :**


| | |
|---|---|
| श्री. हनुमंत पांडूरंग चिकणे | मो. ९७०२९४८२९१ |
| सौ. हौसा बबन जरारे | मो. ९६१९४६०७२७ |
| श्री. नंदकुमार बाबूराव शेलार | मो. ९९२०९८८६३२ |

## * कार्यालयीन वेळ *

मंगळवार ते रविवार – सकाळी १०.३० ते १.०० व संध्या. ४.३० ते ७.०० वा. सोमवार बंद

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ

## ✲ प्रगतीचा दृष्टीक्षेप ✲




## ✲ अधिकारी वर्ग ✲



श्री. सुनिल ह. घनवट (DCM)
व्यवस्थापक



श्री. आनंदा वि. पाटील (GDC&A)
व्यवस्थापक



सौ. अनिता प्र. भोसले (B.Com.)
शाखाधिकारी - अंबरनाथ



श्री. पांडुरंग श्री. पाटील
शाखाधिकारी
बदलापूर



श्री. वैशाली द. घाडगे
शाखाधिकारी
डोंबिवली



सौ. मधुरा म. दाबके (B.A.)
शाखाधिकारी
कल्याण



सौ. सुनंदा वि. जरारे (B.Sc.)
शाखाधिकारी
टिटवाळा



रौप्य महोत्सव कार्यक्रम प्रसंगी दिपप्रज्वलन करताना मा. श्री. विलास देसाई (संस्थापक – अंबरनाथ जय हिंद को. ऑप. बँक लि.) मा. श्री. शिवाजीराव शिंदे (अध्यक्ष – ठाणे जि.ना./प.सह.पतसंस्था फेडरेशन) व मा. श्री. जयवंतराव काटकर पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष




रौप्यमहोत्सवी वर्षाची स्मरणिका प्रकाशन सोहळा

* **अंबरनाथ शाखा –** १०१ व १०२, साकेत अपार्टमेंट, पहिला माळा, वडवली विभाग, अंबरनाथ (पू.), जि. ठाणे. फोन : २६०९७९०
* **बदलापूर शाखा –** ५ व ६, २ रा मजला, अंकूर अपार्टमेंट, आंबामाता मंदिराजवळ, महावीरनगर, बदलापूर (प.) फोन : २६७१४१९.
* **डोंबिवली शाखा –** सुनेत्रा को. ऑ. हौ. सो., सम्राट चौक, डोंबिवली (प.) फोन : ३२०५५०२.
* **कल्याण शाखा –** अन्नपुर्णा को.ऑप. हौ. सोसायटी, पहीला माळा, रिलायन्स वेबवल्ड समोर, कल्याण–मुरबाड रोड, सिंडीकेट,कल्याण (प.) फोन : २३२८५९३.
* **टिटवाळा शाखा –** दत्तधाम को. ऑप. हौ. सोसायटी, दळवी वाडा, मांडा–टिटवाळा (पू.) फोन : २३८२२४१.

प्रेषक –

**श्री महालक्ष्मी नागरी सह. पतपेढी मर्या., अंबरनाथ**

१०१ व १०२, साकेत अपार्टमेंट, पहिला माळा,
वडवली विभाग, अंबरनाथ (पू.), जि. ठाणे – ४२१ ५०१.
दूरध्वनी क्र. : २६०९७९०

प्रति –

श्री./सौ. ______________________

______________________

______________________